महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-९ अंक-२ फेब्रुवारी-मार्च -२०१५

प्रिय कर्मचारी, बंधु आणि भगिनीनों,

आपण नवीन वित्तीय वर्ष २०१५-२०१६ मध्ये प्रवेश केला आहे. ह्या नवीन वर्षात ही मागील वर्षाप्रमाणे महापारेषणची कामगिरी चांगली व उत्कृष्ट व्हावी ह्या करिता आपण सर्वांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे.

चांगली कामगिरी कोणा एकाची किंवा काही समुहाची होऊन चालत नाही, तर सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कामगिरी चांगली होणे गरजेचे ठरते. तसेच सर्व बाबींवर चांगली कामगिरी होणे संघटने करिता आवश्यक असते. उदा. संचलन व सुव्यवस्था, प्रकल्प, बांधकाम, स्थापत्य, चाचणी, वित्त व लेखा तसेच मानव संसाधन.

आजच्या गतिमान जिवनात सतत बदलांना सामोरे जावे लागते. त्याकरिता आपली नियोजन क्षमता उत्कृष्ट असणे गरजेचे आहे. आपली संस्था ही फार जूनी आहे. ती उभी करण्यामागे अनेक लहान मोठ्यांचे योगदान लाभले आहे. अनेक चुकांपासून आपण सुधारणा करत आलो. त्यामुळे अनुभवाची फार मोठी शिदोरी आपल्या पाठीशी आहे. त्याचा पुरेपुर उपयोग आपल्याला करता आला पाहिजे. गती, तत्परता, स्वालंबन, नियोजन व उचित कृती आपल्या संस्थेस भक्कम करण्यात मदत करत असते.

आपले कार्य व व्यवस्थापन प्रणाली यामध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रत्येक अधिकारी यांनी संबंधित विषयाचा सखोल अभ्यास करणे अपेक्षित आहे. विषयाच्या खोलात गेले असता त्यातील अनेक बाबींचा उहापोह होतो आणि काम चांगल्या प्रतिचे व पारदर्शक होण्यास मदत होते.

आजमितीस आपल्या पायाभूत घटकांमध्ये मोठी वाढ करण्यास आपण यशस्वी झालो आहोत. उपकेंद्र, वाहिन्या आणि MVA धारणक्षमता यांची दशकभरापूर्वीची आणि आजची आकडेवारी पाहता यातील वाढीची प्रचिती येते. मात्र आपण यावर समाधानी राहून चालणार नाही. वेगाने वाढते शहरीकरण, बागायती कृषिक्षेत्र, उद्योग व सेवा पुरवठादार यांची सतत वाढती विजेची मागणी पाहता, येत्या काही वर्षात पुरेपुर, अखंडित व रास्त दरात विजेचा पुरवठा करण्याचे मोठे आव्हान नियोजकांसमोर असणार आहे.



वीज प्रणालीतील पुरवठा साखळीमध्ये निर्मीती व वितरण यांच्यामधील महत्वाचा दूवा साधण्याची जबाबदारी महापारेषण म्हणजेच आपली सर्वांची आहे. ती जबाबदारी पेलवत असतांना आपल्याला आपली यंत्रणा निर्मीती तसेच वितरण यांची गरज लक्षात घेऊन उभारावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत आपल्या श्रमाचा व पैशाचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. गरजेनुसार कामे हाती घेतांना ती ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार अंमलात आणली पाहिजे.

आपली प्रणाली उपलब्धता कमाल मर्यादेत न राखणे, पारेषण हानि होणे, व्यत्यय येणे, अपघात होणे, प्रकल्प विलंब आदि बाबी आपल्या नियंत्रणात कशा येतील यावर प्रत्येक अभियंता तसेच अधिकारी यांनी प्रयत्न केले पाहिजे. चुकांची पुनर्रावृत्ती होणार नाही याची सतत खबरदारी घेणे तेवढेच गरजेचे आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा (Automation) चांगला वापर दैनंदिन कार्यात करुन घेतला पाहिजे. ERP प्रणालीला अद्ययावत करुन त्याचा उपयोग आपल्या दैनंदिन कार्यालयीन वापरात करणे गरजेचे आहे.

आधुनिक युगातील आव्हानांना सामोरे जाण्याकरिता आपल्याला अधिक कार्यक्षम व्हावे लागेल. त्याकरिता व्यवस्थापन वेगवेगळ्या प्रशिक्षणांचे नवीन वर्षात आयोजन करणार आहे. त्या प्रशिक्षणांचा आपल्या कौशल्य विकास व कार्यक्षमतेमध्ये वाढ करुन कार्यतत्पर होणे, ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे.

मला आशा आहे. मागील चार वर्षाप्रमाणे या नवीन वित्तीय वर्षातही आपण आपल्या कामगिरीचे लक्ष आपल्या भूमिका व जबाबदारी याच्या अधिन राहून ठरवून घ्याल व त्याच्या पूर्ततेकरीता पाठपूरावा कराल. आपले कार्याचे लक्ष गाठण्यासाठी आपण कसलीही कसर ठेवणार नाहीत. याचा मला विश्वास आहे. तुमच्या प्रयत्नांना यश लाभो ही मनपुर्वक शुभेच्छा.

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## १३२ केव्ही बाळे- देगांव वाहिनीचे सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०९ क्रॉसिंगला उंची वाढवण्याचे काम दिलेल्या प्रमाणित वेळेच्या पूर्वी पुर्ण

राष्ट्रीय महामार्ग क्र. ०९ सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गच्या चौपदरीकरणाचे काम जवळपास पुर्ण झालेले आहे. सदर कामासाठी मौजे. बाळे येथे उड्डाणपुल होत असुन त्याला १९२ के.व्ही. बाळे- देगांव दुहेरी परिपथ वाहिनीचा अडथळा संभवत होता. सबब वाहिनीच्या मनोऱ्याचे उंची वाढवणे खुप गरजेचे होते. सदर कामांतर्गत ४ मनोऱ्यांची पायाभरणी (२ दुहेरी परिपथ, २ चौहेरी परिपथ), उभारणी तसेच सध्याचे ३ मनोरे काढून तार ओढण्याचे काम युध्दपातळीवर करणे अत्यंत आवश्यक होते. सदर वाहिनीवर सोलापूर शहराचा विद्युत पुरवठा अवलंबित आहे त्यामुळे संबंधित काम वेळेत पुर्ण न झाल्यास सोलापूर शहर व परिसर येथे अधिकचे भारनियमन होण्याची शक्यता होती. त्यानुसार दिनांक ११,१३ व १४ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ६ ते संध्याकाळी ६ असे एकुण ३६ तासात काम पुर्ण करणे अत्यंत गरजेचे होते. महापारेषण चे प्रतिनिधी श्री.आर.एल. गायकवाड (अधीक्षक अभियंता), श्री.संजु किसन गाडे (कार्यकारी अभियंता), श्री.विनय दोशी (अति.कार्य. अभियंता), व श्री.देवरकोंडा (अति.कार्य. अभियंता) तसेच अउदा बांधकाम विभाग, ३ सोलापूर व अउदा तारमार्ग बांधकाम उपविभाग, देगांव यांच्या परिपुर्ण तांत्रिक सर्वेक्षणाखाली उपरोक्त काम फक्त २७ तासात यशस्विरित्या पुर्ण करण्यात आले. सदर मनोरे उभारणी व तारा ओढण्याचे काम हे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग महामार्ग, यांच्यामार्फत मे.विवेकानंद टेड्रर्स सोलापूर, आयडिया आणि जरांडे इंजिनिअर्स यांनी पुर्ण केले.

सदर कामासाठी अउदा सं.व.सु. मंडळ सोलापूर यांच्या मार्फत श्री.चव्हाण र.प. (अधीक्षक अभियंता), श्री.जाधवर (अति. कार्यकारी अभियंता) व श्री. धमुरे (अति. कार्यकारी अभियंता) यांचे सहकार्य मिळाले.

सदर कमी वेळेत केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग, महामार्ग यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेऊन 'महापारेषण' कंपनीस धन्यवाद दिले.

## १३२ के.व्ही नरसी उपकेंद्रात १३२/३३ के.व्ही. ५० एम.व्ही.ए. रोहित्राची जागेवर दुरुस्ती




दि. २३/११/२०१४ रोजी १३२ के.व्ही नरसी उपकेंद्रातील १३२/३३ के.व्ही. ५० एम.व्ही.ए. रोहित्र हे डिफरंशीएल प्रोटेक्शन, पी.आर.व्ही. व बुकोल्झ (Buchholz) आल्याने बंद झाले होते. सदरहू रोहित्र चाचणी विभाग, नांदेड यांनी टेस्ट केले असता एल.व्ही. वायंडींग डॅमेज असण्याची शक्यता नोंदविण्यात आली. चाचणी विभाग, नांदेड व अ.उ.दा.(सं.व.सु.) विभाग, नांदेड यांनी संयुक्त निरिक्षण पार पाडले. निरिक्षणाअंती सदर रोहित्रचा एल.व्ही.बुशिंग रॉड खराब झाल्याचे निदर्शनास आले. मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली सदरहू रोहित्र कोठेही दुरुस्तीसाठी न पाठवता जागेवरच दुरुस्ती करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार दि. १७/०१/२०१५ रोजी सपूंर्ण दुरुस्ती व चाचण्यांनंतर नरसी उपकेंद्रातील रोहित्र यशस्वीरित्या चालू करण्यात आले. या उपक्रमामुळे महापारेषण कंपणीचे ट्रान्सफॉर्मर ट्रान्सपोटेंशन, लोडींग अनलोंडीग आणि विवींगसाठी लागणाऱ्या खर्चाची बचत झाली.

## गडचिरोलीतील दुर्गम भागात ही आता होणार योग्य दाबाचा आणि अखंडित विद्युत पुरवठा

गडचिरोली जिल्ह्यातील अति दुर्गम व नक्षल प्रभावित भागामंध्ये योग्य दाबानी व विनाखंडित विद्युत पुरवठा सुनिश्चित करण्याकरीता केलेल्या उपाययोजना. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये विद्युत पुरवठा करणारी गडचांदुर ते सिरोंचा हि ६६ के. व्हि. ची वाहिनी अंदाजे २२५ किमी लांबीची आहे. या वाहिनीला अंदाजे ४० वर्षे पुर्ण झालेली आहेत. ही वाहिनी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त अति दुर्गम भागाला विद्युत पुरवठा करते. या वाहिनीची लांबी २२५ किमी असल्यामुळे (नक्षलग्रस्त भागांना) सिरोंचा, आल्लापल्ली, एटापल्ली, जिमलगट्टा इत्यादी या भागांना कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत होता व विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रमाण जास्त होते. तसेच अत्यंत लांब वाहिनी असल्यामुळे पारेषण हानी ही होत होती. अउदा संवसु प्रविभाग, चंद्रपुर नी १३२ के. व्हि. आष्टी येथे १३२/ ६६ के. व्हि. २५ एम. व्हि. ए. या क्षमतेचे दोन रोहित्र पाठपुरावा करून मंजूर करून घेतले व त्यापैकी एक रोहित्र कार्यान्वित केले. तसेच ६६ के. व्हि. आष्टी - आल्लापल्ली विद्युत वाहिनी २३.०१.२०१५ ला चार्ज करून विद्युत पुरवठा डायव्हर्ट केला. त्यामुळेच अति दुर्गम नक्षल प्रभावित भाग जसे की आल्लापल्ली, एटापल्ली, जिमलगट्टा ला आष्टी येथून विद्युत पुरवठा करणे सुरू झाले. एकुण वाहिनीची लांबी १०० किमी ने कमी झालेली आहे. एकुणच विद्युत हानी, वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा व कमी दाबाचा विद्युत पुरवठा या तिन्ही त्रुटी दूर करण्यात यश आलेले आहे. या उपक्रमाचे श्रेय तत्कालीन मुख्य अभियंता, मा. श्री. एल. एस. सोनकवडे, तत्कालीन अधिक्षक अभियंता, मा. श्री. एन. एस. तेलतुंबडे, प्रभारी अधिक्षक अभियंता, मा. श्री. एच. वाय. ठाकरे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, मा. श्री. एस. डब्लु. बडवे, उपकेंद्र प्रमुख, श्री. एन. एन. येनगंदेलवार, कंत्राटदार, श्री. विलास पाटील, श्री. मनोज जाधव व संपूर्ण अउदा संवसु प्रविभाग चंद्रपूर व बल्लारशाह विभागाच्या अभियंताना जाते.

## औरंगाबाद परिमंडळात स्टाफिंग नार्मस् कमिटीची बैठक



औरंगाबाद परिमंडळात महापारेषणच्या स्टार्फिंग नॉर्मस कमिटीची बैठक दि. २४/०२/२०१५ रोजी झाली. या बैठक मध्ये कमिटीचे मान्यवर अध्यक्ष श्री. संजय शिंदे, मुख्य अभियंता (मा.सं.वि.), श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता (अउदा संवसु परिमंडळ, औरंगाबाद), श्री. सुगत गमरे, महा. व्यवस्थापक (मा. सं. तां.आ.), श्री.अनिल कोलप, अधिक्षक अभियंता हे उपस्थित होते या प्रसंगी औरंगाबाद परिमंडळातील अधिक्षक अभियंते, श्री. नासिर कादरी, श्री. रुपेश फरकाडे, श्री. शशांक जेवळीकर, श्री अरूण वाघमारे, श्री. भुषण बल्लाळ व सर्व कार्यकारी अभियंते तसेच मानव संसाधन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. स्टाफिंग नार्मस संबधी या सर्व फील्ड वरील अभियंत्यानी आपआपल्या विभागाचे कामासंबधी म्हणणे या कमिटी समोर मांडले. कमिटीच्या सभासदांनी या सर्व अधिकाऱ्यांचे शंका निरसन करुन त्यांनी केलेल्या सुचना /शंका विचारात घेतल्या. औरंगाबाद परिमंडळातर्फे या कमिटीच्या मान्यवर सभासदाचे आभार व्यक्त करुन बैठक संपन्न झाली.

## चंद्रपूर येथे प्रशिक्षण आपल्या दारी-(Know Your Sub-Station) कार्यशाळा संपन्न

एच.व्हि. डी.सी. ग्र. कें. (सं.व.सु.) प्रविभाग, चंद्रपूर अंतगर्त, ४०० कि. व्हो. ग्र. कें. (सं.व.सु.) विभाग- २, चंद्रपूर व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर च्या संयुक्त विद्यमाने दि. २०.०२.२०१५ व दि. २४.०३.२०१५ ला "प्रशिक्षण आपल्या दारी (Know Your Sub-Station) या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा अनुक्रमे ४०० के. व्ही. चंद्रपूर -२, उपकेंद्र व ४०० के. व्ही. स्विचिंग उपकेंद्र, चंद्रपूर ला उत्साहात संपन्न झाली. सदर कार्यशाळेत उपकेंद्रातील कामाचे स्वरूप, विजेचे व्यवस्थापन, रिले वाचन, एसी व डीसी वितरण प्रणाली, विविध



उपकरणांची देखभाल व प्रणाली दोषोत्तर अवस्थेत निर्माण होणांऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याचा विविध विषयांशी उपस्थितांना अवगत करून देण्यात आले.

सदर प्रशिक्षण / कार्यशाळेत श्री. एस. डी. अणे (अधिक्षक अभियंता), श्री. के.ए. प्रगट, श्री. जे. एम. कोकाटे, श्री. कुकडे, कार्यकारी अभियंता, श्री. स्वप्नील सावे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी उपस्थित सर्व अभियंते व कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेची संकल्पना व संचालन श्री. उमेश शेंडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर तथा श्री.विवेक असरानी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता ४०० के. व्ही. स्विचिंग उपकेंद्र, चंद्रपूर यांनी सांघिक कार्यालयाच्या प्रशिक्षण विभागाच्या निर्देशावरून साकारली असुन अशा प्रकारचे प्रशिक्षण नागपूर परिमंडळातील इतर उपकेंद्रातून सुध्दा घेतले जाणार आहे.

## औरंगाबाद परिमंडळा अंतर्गत तांत्रिक कर्मचाऱ्यां करिता अभियांत्रीकी क्षमता वर्धन कार्यक्रम (कॅपसिटी बिल्डिंग प्रोग्राम)

दि. २६/०३/२०१५ रोजी १३२ के.व्ही. उपकेंद्र अहमदपुर येथे चाचणी उपविभाग - २ व दि. ३०/०३/२०१५ रोजी १३२ के.व्ही. उपकेंद्र किल्लारी येथे चाचणी उपविभाग-१ लातुर यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यासाठी क्षमता वर्धन कार्यक्रम (कॅपसिटी बिल्डिंग प्रोग्राम) राबवला. या कार्यक्रमांतर्गत सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना कामाचे उदा. उपकेंद्र रचना, संरक्षक प्रणाली, उपकरणांची सविस्तर कार्यप्रणाली व दुरुस्ती तसेच कमीत कमी वेळात नॉर्मल रिस्टोर करण्याची आवश्यकता व सोदाहरण पध्दती इत्यादीचे सविस्तर विवेचन,



प्रात्यक्षिक व शंका निरसन करण्यात आले. चाचणी उपविभाग - १ लातुर अंतर्गत श्री. सु.ल. नाडे, श्री. रा.प. राऊत (उ.का.अ.) त्यांचा संघ यांनी १३२ के.व्ही. उपकेंद्र किल्लारी व तसेच चाचणी उपविभाग - २ लातुर अंतर्गत श्री. आर.एम.जोशी (अ.का.अ.), व त्यांचा संघ यांनी १३२ के.व्ही. उपकेंद्र अहमदपुर येथील कर्मचाऱ्यास मार्गदर्शन व शंका निरसन केले. अशा प्रकारचे प्रशिक्षण आणि कार्यशाळांचे आयोजन औरंगाबाद परिमंडळात सातत्याने केले जाते.

## जागतिक ग्राहक दिन -१५ मार्च

ग्राहक (Customer) सर्वात महत्वाचा घटक आहे. असे महात्मा गांधी यांनी प्रतिपादन केले होते. ग्राहकाच्या समाधानावर व्यवसायाची प्रगती अवलंबुन असते व त्यामुळे ग्राहकांची सुयोग्य काळजी घेणे गरजेचे आहे.

आर्थिक व्यवस्थेच्या रचने मध्ये बदल झाल्या नंतर Customer Sovereignty ही संकल्पना दृढ झाली. Controlled Economy ते Liberalisation - Globalisation ह्या रूपांतरात माल विकणारा राजा होता, तर आता माल खरेदी करणारा राजा झाला आहे. सर्वत्र Value for Money अशी मागणी करणारा ग्राहक आज आपण पाहतो. आज मालाचा पुरवठा जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातुन करणे, सहज सोपे झाले आहे. Technology व Transport मुळे Localisation of Globe and Globalisation of India झालेले आपण पाहतो.

आज विजक्षेत्रात ही ग्राहक Tarriff pay करण्यास तयार आहे, मात्र त्यास अखंड विज पुरवठा देण्यात यावा अशी मागणी तो ठेवतो. भारनियम असु नये व विजपुरवठा अविरत राहावा अशी त्याची मागणी आहे. त्याकरीता आपल्या तिन्ही कंपन्याना एकमेकांशी समन्वय साधुन व नियोजन करून ग्राहकांची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे.

Customer Care, Customer Support, Relationship Management, BPO, Call Centres, Sales Service, इत्यादि अनेक घटक आज ग्राहक सेवेकरिता प्रस्थापित झालेले आपण पाहतो. ग्राहकांना न्याय मिळवून देण्याकरिता सरकार पातळीवर वेगवेगळे विभाग स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यामुळे कोणाचीही फसवणुक होणार नाही याची काळजी घेण्यात येते, ग्राहकांचा Hard Earned Money सार्थकी लागावा व त्यांना Value for Money मिळावा ही त्यामागची भावना असते.

## नाशिक परिमंडळात मोफत आरोग्य तपासणी शिबीर

अऊदा बांधकाम नि संवसु परिमंडळ नाशिक कार्यालयात दिनांक १० मार्च २०१५ रोजी "सिक्स सिग्मा सुपर स्पेशालीटी हॉस्पीटलच्या" वतीने नाशिक परिमंडळांतर्गत कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर नाशिक परिमंडळ कार्यालयात आयोजित करण्यात आले.

"सिक्स सिग्मा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलच्या" वतीने डॉ. वाघ, डॉ. शर्मा, डॉ. सांगळे व त्याच्या सहकाऱ्यांनी महापारेषण कंपनीच्या अधिकारी/कर्मचारी यांची Blood, Sugar, Blood Pressure High / Low, ECG, Weight Physical Requirement of Medical Officer इत्यादी तपासण्या यावेळी करण्यात आल्या सदर मोफत आरोग्य तपासणी शिबीराचा अधिकारी /कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.

सदर शिबीराचे उद्घाटन दिनांक १०-०३-२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्य अभियंता, श्री. बी.टी. राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने अधिकारी / कर्मचारी यांनी सदर तपासणीचा लाभ घेतला.

## अभिप्राय



Personal Effectiveness वर चार दिवसांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी व्यवस्थापनाकडून आम्हाला मिळाली त्याबद्दल मनपूर्वक आभार.

कंपनीच्या कार्यक्षेत्रापासून दूर निर्सगरम्य ठिकाणी चांगल्या वातावरणात चार दिवस कसे निघुण गेले कळलेच नाही. ह्या चार दिवसात ज्ञानात अतिशय चांगली भर पडली. नविन आव्हाने, कार्य कुशलता, व्यवस्थापन, सर्जनशीलता अशा अनेक विषयावर उहापोह करूण तसेच चर्चा करून विषय समजवण्यात आले. आपली कार्यशक्ती वाढवूण संघटनेची ध्येय व उद्देश गाठण्यास आपण कसे हातभार लावु शकतो हे समजले.

कोणतीही मोठी गोष्ट सुरवातीला लहान असते. सततच्या परिश्रमातून ती मोठी होते हे वेगवेगळया माध्यमातुन सांगण्यास आले. Group Exercise, Case Study, Video Show तसेच Presentation च्या सुयोग्य वापरातून कठीण विषय समजण्यात अडचण जाणवली नाही.

ही संधी सर्वांना मिळो अशी व्यवस्थापनास नम्र विनंती.

**श्री. ऋषिकेश कुलकर्णी**
**कु. रेणुका नाटके**
**श्री. धिरज ढोके**
**मु.का., मुंबई.**

## पारेषणच्या बास्केटबॉल संघाचे त्रिवेणवेली येथील स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन



महाराष्ट्र राज्य विद्यूत पारेषण कंपनीच्या बास्केटबॉल संघ त्रिवेणवेली (तमिळनाडू) येथे ४० व्या आंतरराज्य विद्यूत मंडळाच्या बास्केटबॉल स्पर्धेकरिता रवाना झाला होता. सदर स्पर्धा दि. २५.०२.२०१५ ते २८.०२.२०१५ रोजी त्रिवेणवेली येथे आयोजित केल्या होत्या सदर स्पर्धेत महापारेषण कंपनीचा बास्केटबॉल संघाने उत्कृष्ट प्रदर्शन केले.

संघासोबत व्यवस्थापक म्हणून सांघिक कार्यालयाचे श्री. अशोक साळुंखे यांनी काम पाहिले.

## ८ मार्च जागतीक महिला दिन



महिलांचे सक्षमीकरण या विषयावर महापारेषण कंपनी "तेजस्वीनी" हा प्रशिक्षण कार्यक्रम कंपनीत महिला कर्मचाऱ्यांकरीता राबवत आहे. महिलांच्या प्रगतीवर त्या देशाची प्रगती अवलंबुन असते. आज आपल्या देशातही महिलांचे अबला पासुन सबला मध्ये रूपांतर होतांना आपण पाहतो.

महापारेषण कंपनीत मोठ्या प्रमाणावर महिला अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. मोठ्या धैर्याने व आत्मविश्वासाने त्या संपूर्ण महाराष्ट्रात दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी कार्यरत आहेत. नौकरीत महिलांना अनेक जवाबदाऱ्या संभाळाव्या लागतात त्याची व्यवस्थापनाला जाणीव आहे व त्या मुळेच त्यांच्या सुरक्षित कार्यक्षेत्र व सुविधा बद्दल विशेष लक्ष व्यवस्थापन देत असते. त्यांचे मनोबल वाढावे तसेच सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे या करीता व्यवस्थापन वेळोवेळी कार्यक्रम राबवत असते. संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यालयात ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. मुख्य कार्यालय, मुंबई येथे गुरूनानक हॉस्पिटल येथुन महिलांचे तज्ञ डॉक्टर बोलवुन महिलांबरोबर चर्चासत्राचा कार्यक्रम मुख्य औद्योगिक संबंध विभागातर्फे आयोजित करण्यात आला.

## अउदा बंध.नि.संवसु परिमंडळ, नागपूर येथे जागतिक महिला दिनाचे आयोजन

८ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन दि. १०.०३.२०१५ रोजी सर दादाभाय हॉल 'प्रकाशभवन' गड्डीगोदाम नागपुर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. लक्ष्मीदास सोनकवडे, मुख्य अभियंता, नागपूर हे होते. प्रमुख अतिथी म्हणुन श्री. योगानंद काळे, माजी प्र. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, श्रीमती शिवानी दाणी, संचालिका मनी बी फायनानसियल इनस्टिट्युट, नागपूर, श्रीमती शिवाली देशपांडे फ्लाईंग ऑफिसर, नागपूर या प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थितीत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्वलन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन झाले, तद्नंतर शिवानी दाणी यांनी गुंतवणुकीच्या नवीन संधी व बचतीचे महत्व यावर उदाहरणासह सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाली देशपांडे यांनी सुद्धा महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातुन अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच श्री. योगानंद काळे, माजी प्र. कुलगुरु यांनी सुद्धा महिलांचे मनोधैर्य वाढावे म्हणुन मार्गदर्शन केले. तसेच श्री. अभय रोही, सहा महाव्यवस्थापक (मांस), कु. आरती पगारे, प्रभारी सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) व श्रीमती किशोरी मित्र कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले.

श्री. लक्ष्मीदास सोनकवडे, मुख्य अभियंता यांनी अध्यक्षीय भाषण करतांना आज महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन काम करत आहेत व त्यांना योग्य ती संधी मिळाल्यास त्या सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवु शकतात व ह्याचीच प्रचिती म्हणुन १३२ के.व्ही. मानकापुर व २२० के.व्ही. बुट्टीबोरी – III या महिला संचालित उपकेंद्राची निर्मिती करण्यात आली व महिला उपकेंद्र प्रमुख त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी उत्तमपणे पार पाडत आहेत. तसेच अध्यक्षीय महोदयांनी महिलांनी काम कारतांना त्यांनी स्व:ता भोवती आखलेली चौकट त्या रुंदावतात परंतु महिलांनी आज ती चौकट तोडुन बाहेर यावे. अशी अपेक्षा व्यक्त केली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता श्री. अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (मांस), यांच्या मार्गदर्शनाखाली कु. श्रद्धा राऊत, व्यवस्थापक (मांस), श्रीमती मंदा लाले, लघुटंकलेखिका, श्री. जयंत गणोरकर, व्यवस्थापक (मांस) श्री. राजेश कुंभारे, श्री. प्रल्हाद रामटेके, उप. व्यवस्थापक (मांस) श्री. संजय भड, नि.लि., श्री. प्रविण भालेराव, नि.लि., श्री. शेट्टी पहारेकरी यांनी परिश्रम घेतले.

आभार प्रदर्शन कु. सुखदा सोनट्टके, उप. व्यस्थापक (मांस) यांनी केले व अल्पोहार नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमा द्वारे परिमंडळातील कार्यरत सर्व महिलांचे मनोबल उंचावण्यास मदत झाली.






नागपूर मंडळातील महिलादिनांचे क्षणचित्र

# महापारेषणच्या विविध परिमंडळे व कार्यालयात शिवजयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली

## शिव जयंती महापारेषणच्या मुख्य कार्यालयात साजरी



महापारेषणच्या मुंबई येथील प्रकाशगंगा या मुख्य कार्यालयात दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. ओ.के. एम्पाल, संचालक (संचलन / प्रकल्प) यांनी भुषविले. मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दिप प्रज्वलित करून झाली. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व कर्तृत्व याची माहिती ही मान्यवरांनी दिली.

## शिव जयंती महाराष्ट्रातील महापारेषणच्या कार्यालयात मोठ्या उत्साहाने साजरी

महापारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील विविध कार्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यक्रमात सहभागी झाले होते. अनेक मान्यवरांनी या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची माहिती उपस्थित जनसमुहास करून दिली. छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा.

## आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा सन् २०१४-२०१५

आंतर परिमंडलीय नाट्य स्पर्धा सन् २०१४-२०१५ च्या अंतिम स्पर्धेचे आयोजन दि. ०९.०२.२०१५ ते दि. १२.०२.२०१५ दरम्यान सातारा येथे करण्यात आले होते. सदर नाट्य स्पर्धेमध्ये महापारेषण च्या परिमंडळांनी स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत सर्व परिमंडळांनी दर्जेदार नाट्य सादर केले. त्यात गुणानुक्रमे दोन नाटकांना प्रथम व द्वितीय अशी पारितोषिके देवून गौरविण्यात आले. त्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक नाशिक परिमंडळातील "कुस बदलताना" या नाटकास, तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक वाशी परिमंडळाचे "आर.आर. कुलकर्णी " या नाटकास प्रदान करण्यात आले. या बरोबरच या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे नाटक हे राज्य स्तरीय स्पर्धेत पात्र ठरले. या स्पर्धेतील सर्व सहभागी व विजेत्या परिमंडळाचे महापारेषण परिवारा तर्फे अभिनंदन व नाशिक परिमंडळ संघास पुढील स्पर्धे करिता शुभेच्छा.

## महापारेषणच्या प्रकाशगंगा कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी





दिनांक १४.०४.२०१५ रोजी महापारेषणच्या प्रकाशगंगा येथील मुख्य कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ओ.के.एम्पाल, संचालक संचलन, महापारेषण हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दिप प्रज्वलन करून झाली. त्यांनतर वंदन गीत व प्रार्थना पार पडली ह्या नंतर वरिष्ठ अधिकारी व अध्यक्ष श्री. ओ. के. एम्पाल यांनी इतर उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महापारेषणच्या विविध कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी

महाराष्ट्रातील महापारेषणच्या विविध विभाग व कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विविध कार्यक्रमांचे आयोजन जयंती निमित्त करण्यात आले. अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची माहिती उपस्थितांना करून दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस त्रिवार अभिवादन.

## बाभळेश्वर RTC चे CEA द्वारा Inspection


प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, बाभळेश्वर यांची CEA मान्यता पुढील वर्षाकरिता बहाल करण्याकरिता CEA च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी RTC बाभळेश्वरला दि. २३ व २४ मार्च रोजी भेट दिली. त्या करिता नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री. बी. टी. राऊत व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी केंद्राच्या कार्याची माहिती करून दिली. तसेच CEA कडून केंद्राची पाहणी होण्याकरिता समन्वय साधला.

## जे. एस. मोमीन यांची लखनऊ येथे कुस्ती मध्ये कांस्य कामगिरी



लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या २०१४-२०१५ च्या अखिल भारतीय विद्युत कुस्ती क्रिडास्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या औरंगाबाद येथील श्री. एस. जे.मोमीन, अऊदा बांधकाम नि संवसु परिमंडलांतर्गत येणाऱ्या अऊदा संवसु विभाग, औरंगाबाद येथे कार्यरत आहे. श्री. एस. जे. मोमीन, तंत्रज्ञ श्रेणी ४ यांनी ५७ किलो वजनी गटात कुस्ती क्रिडा प्रकारामध्ये “कांस्य” पदक पटकावून महापारेषण कंपनीचे नावलौकिक केले. त्याबद्दल त्यांचा औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता व कर्मचारी यांच्या कडून अभिनंदन व कौतूक करण्यात आले.

श्री. एस. जे. मोमीन, यांच्या उज्ज्वल यशाबद्दल महापारेषण परिवारा तर्फे हार्दीक अभिनंदन.




## नागार्जुनराव ठरले पॅरालिंपिक जलतरण स्पर्धेतील अर्जुन



अउदा स्थापत्य बांधकाम व सुव्यस्था मंडल औरंगाबाद या कार्यालयात कार्यरत असलेले श्री. नागार्जुनराव अकुला, व्यवस्थापक (विवले) यांनी मुंबई येथे दिनांक २८-२९.०३.२०१५ रोजी राज्यस्तरीय पॅरालिंपिक जलतरण स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी ३ पदके पटकावली आहे. श्री. नागार्जुनराव अकुला यांनी १०० मीटर बँक स्ट्रोक मध्ये गोल्ड पदक, ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोकमध्ये गोल्ड पदक व १०० मीटर फ्री स्टाईल मध्ये कांस्य पदक पटकावले. सदरील स्पर्धा या औरंगाबाद डिस्ट्रीक पॅरालिंपिक असोसिएशनने आयोजीत केल्या होत्या.

श्री. नागार्जुनराव अकुला हे दोन्ही पायाने अपंग (८७ टक्के) असूनही त्यांनी केलेल्या या उत्तुंग कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. एका अपंग अधिकाऱ्याने केवळ मेहनत, चिकाटी व असिम इच्छशक्तीच्या जोरावर मिळवलेले हे सुयश आहे.

## वेताळ यांची लखनऊ येथे कुस्ती मध्ये कांस्य कामगिरी



लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या २०१४-२०१५ च्या अखिल भारतीय विद्युत कुस्ती क्रिडास्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कराड येथील अऊदा बांधकाम नि संवसु परिमंडलांतर्गत येणाऱ्या अऊदा संवसु विभाग, कराड यांचे कार्यालयांतर्गत वाहिनी देखभाल उपविभाग, ओगलेवाडी येथे कार्यरत असणारे श्री. पोपट बाळू वेताळ, तंत्रज्ञ श्रेणी ४ यांनी ७४ किलो वजनी गटात कुस्ती क्रिडा प्रकारामध्ये “कांस्य” पदक पटकावून महापारेषण कंपनीचे नावलौकिक केले. त्याबद्दल त्यांचा कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. गणपत तु. मुंढे यांच्या कडून तसेच कराड परिमंडलाचे अधिकारी / कर्मचारी यांचे कडून अभिनंदन व कौतूक करण्यात आले.

श्री. पोपट बाळू वेताळ, तंत्रज्ञ श्रेणी ४ यांना कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री. गणपत तु. मुंढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

श्री. पोपट बाळू वेताळ यांच्या उज्ज्वल यशाबद्दल महापारेषण परिवारा तर्फे हार्दीक अभिनंदन.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकारी यांची नियुक्ती / निवृत्ती माहे फेब्रुवारी मार्च - २०१५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नियुक्ती:** | | | | |
| **अ.क्र** | **नाव** | **पद** | **पदस्थापनेचे ठिकाण** | **दिनांक** |
| निरंक | | | | |
| **निवृत्ती:** | | | | |
| १. | श्री. पसराटे भगिरथ लालु | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अति. उच्च दाब, संवसु मंडळ पनवेल, मुंबई | २८.०२.२०१५ |

## Safety and Security at Mahapareshan

**Better be safe than be sorry.** Safety and Security is not the responsibility of one individual or a Department; it is everybody's responsibility in the organization. It is both life and property need to be safe and secure. More than damage to property, it is the loss of precious life which is of concern.

It does not require much trouble to ensure safety and security in the organization. It is just to inculcate the habit of adhering to the guidelines issued by the Company in respect of safety and security.

At MSETCL, we have taken up the objective of zero accidents. It is to be ensured that Personal Protective Equipments are used all the time when we are close to hazard. Other guidelines are also required to be followed scrupulously. There should not be laxity towards safety and security aspects in the organization on any account.

All are requested to co-operate and to ensure safety of all and security at Mahapareshan.

Chief Security Officer
C.O., Mumbai

# सूचना

महापारेषण समाचारसाठी बातमी पाठवताना ती कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत व छायाचित्रासह
prohr@mahatransco.in
या ई-मेलवर पाठवावी ही विनंती.

## PERFORMANCE REVIEW

In our Company, we have Annual Performance Appraisal Report System for PG I & II employees and Annual Confidential Report System for PG III & IV employees for conducting Annual Performance Review.

Now that performance year 2014-2015 has come to an end and new performance year 2015-2016 began, it is requested to complete APAR/ ACR for the year 2014-2015 and to assign performance targets for the year as 2015-2016 as per individual role and responsibility by the superior officer to his subordinate officer in respect of APARS.

In case any clarification is required the Head HR of Zone or PA Cell at C.O., Mumbai may be contacted.

## React v/s Respond




सामन्य व्यक्ती प्रसंगी पटकन React करुन बाजूला होतो, परंतु असाधारण व्यक्ती React न करता Respond करतो आणि त्यामुळेच तो असाधारण ठरतो.

तसे अनेक चांगल्या वाईट प्रसंगांना आपणास दैनंदिन जिवनात सामोरे जावे लागते व यालाच जिवन असे म्हणतात. React करतांना आपण मागचा पुढचा विचार करत नाही. पण Respond म्हणजे विचार करुन केलेली कृती होय. मात्र ही कृती करतांना, कृती बद्दल विचार करतांना जास्त वेळ घेऊ नये. तेवढ्याच वेळात आपल्याला Respond करता आले पाहिजे. नकळत त्याची सवय जडली पाहिजे.

काही लोक म्हणतात मी बिनधास्त आहे, भावनिक आहे, मला धीर /गंभीर राहता येत नाही. Respond करणे म्हणजे असे काही होईल असे नाही. उदाहरण द्यायचे झालेच तर, एका हॉटेल मध्ये काही तरुणी जेवण करण्यास गेल्या, एवढ्यात एका तरुणीच्या कपड्यावर झुरळ पडतो. तो पाहून ती लगेच किंचाळते व झुरळ झटकून देते. तो झुरळ दुसऱ्या तरुणीच्या कपड्यावर पडतो. ती ही त्याच प्रकारे React करते. सर्व घाबरुन जातात. एवढ्यात तिथे हॉटेलचा वेटर येतो. तो झुरळ त्याच्या कपड्यावर बसतो. तो त्या झुरळाला पकडतो व दूर फेकतो व आपल्या कामी कागतो. वेटरचे ह्या प्रसंगीचे वागणे म्हणजे Respond.



जिवनात मोठे व्हायचे असेल तर Respond ची सवय बाळगा. Reaction मुळे प्रसंगी Issue अधिक किचकट होऊन Spoil होण्याची शक्यता जास्त असते. मात्र Respond केल्यामुळे बऱ्याच वेळा Issue तेथेच संपतात किंवा नियंत्रणात राहण्यास मदत होते.

आज आपल्याला पटणारी कोणतीही आदर्श व्यक्ती अभ्यासा, तुम्हाला त्यांच्या Respond Ability चा परिचय येईल. त्यामुळेच कदाचित Responsibility ह्या शब्दाची उत्पत्ती झाली असावी असे वाटते. (Response+ Ability ), तुम्हाला असाधारण व्यक्ती म्हणून बघण्यात मला खुप आनंद होईल. प्रत्येक जनामध्ये कुवत असते. त्याला फक्त प्रबळ इच्छाशक्तीची जोड लाभली की काहीच अशक्य नाही. जिवनाचा कंट्रोल आपल्या हातामध्ये पाहिजे, जिवनाने आपल्याला कंट्रोल केलेले नसावे व ते Respond Ability मुळे शक्य होते. शुभेच्छा सह !!!

**From the Desk of ED (HR)**

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.